RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक १०५] शुक्रवार, सप्टेंबर १३, २०१९/भाद्र २२, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २४४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ सप्टेंबर २०१९

**अधिसूचना**

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक आरपीए-१४१५/प्र.क्र. ४५/र-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक आरपीए-१४१५/प्र.क्र.४५/र-१, दिनांक ११ सप्टेंबर २०१७ द्वारे, उक्त अधिनियमाद्वारे व त्याअन्वये प्रदान केलेली अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचा संपूर्ण महाराष्ट्र राज्यात वापर करण्यासाठी नागपूर येथे भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःर्स्थापना प्राधिकरण स्थापन केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास, उक्त अधिनियमाच्या कलम ५१ अन्वये, आणखी एक भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःर्स्थापना प्राधिकरणाची स्थापना करणे इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ५१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक आरपीए-१४१५/प्र.क्र.४५/र-१, दिनांक ११ सप्टेंबर २०१७, अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाद्वारे प्रदान केलेली अधिकारिता, अधिकार व प्राधिकार यांचा यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रामध्ये वापर करण्यासाठी स्तंभ (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःर्स्थापना प्राधिकरणांची स्थापना करीत आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. (१) | प्राधिकरणाचे नाव (२) | प्राधिकरणाची अधिकारिता (३) |
|---|---|---|
| १ | भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःर्स्थापना प्राधिकरण, नागपूर | नागपूर व अमरावती महसुली विभाग |
| २ | भूमी संपादन, पुनर्वसन व पुनःर्स्थापना प्राधिकरण, औरंगाबाद | औरंगाबाद, नाशिक, कोकण व पुणे महसुली विभाग |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय बनकर,**

शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 11th September 2019

*NOTIFICATION*

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. RPA-1415/C.R. 45/R-1.—Whereas, the Government of Maharashtra, *vide* Government Notification, Revenue and Forest Department, No.RPA-1415/C.R.45/R-1, dated the 11th September 2017, issued in exercise of the powers conferred by section 51 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (No. 30 of 2013)(hereinafter referred to as the "said Act"), established the Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Authority at Nagpur to exercise jurisdiction, powers and authority conferred on it by or under the said Act in the whole of the State of Maharashtra ;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to establish one more Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Authority under section 51 of the said Act ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 51 of the said Act and in supersession of Government Notification, Revenue and Forest Department, No.RPA-1415/C.R.45/R-1, dated the 11th September 2017, the Government of Maharashtra hereby establishes the Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Authority as mentioned in Column (*2*), to exercise jurisdiction, powers and authority conferred on it by or under the said Act, in the area mentioned in column (*3*) of the schedule appended hereto.

*Schedule*

| Sr. No. (1) | Name of the Authority (2) | Jurisdiction of the Authority (3) |
|---|---|---|
| 1 | Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Authority at Nagpur. | Nagpur and Amravati Revenue Division. |
| 2 | Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Authority at Aurangabad. | Aurangabad, Nashik, Konkan and Pune Revenue Division. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY BANKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.